सार्वजनिक आरोग्य विभागाच्या आरोग्य सेवा आयुक्तालयांतर्गत कार्यरत गट क व ड संवर्गाकरीता नियुक्ती प्राधिकारी घोषित करणेबाबत.

# महाराष्ट्र शासन

## सार्वजनिक आरोग्य विभाग

## शासन निर्णय क्रमांकः निप्राधिकारी २०२१/प्र.क्र ६१३/सेवा ५

गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार १० वा मजला,
मंत्रालय,मुंबई-४००००१
तारीखः १६ फेब्रुवारी, २०२४

**संदर्भ :**

१) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांकः एसआरव्ही-२०१६/प्र.क्र२९०/कार्यासन१२, दि.१९.११.२०१६.

**प्रस्तावना :**

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिपत्याखालील आरोग्य सेवा आयुक्तालयाअंतर्गत येणाऱ्या रुग्णालयीन सेवा तसेच कार्यालयीन गट क व ड मधील ३०० पेक्षा अधिक संवर्ग कार्यरत आहेत.

विभागाकडून विविध राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम राबविण्यात येतात. उदा. अंधत्व निवारण, निक्षय भारत, कुष्ठरोग निर्मुलन, राष्ट्रीय हिवताप निर्मुलन, विविध साथरोग निर्मुलन कार्यक्रम इ. असे कार्यक्रम राबविताना समान काम परंतू भिन्न पदनाम असल्याने किंवा नियुक्ती प्राधिकारी भिन्न आहेत. कारण त्या विशिष्ट कार्यक्रमांतर्गत नियमित तसेच कंत्राटी अथवा हंगामी तत्वावर पदनिर्मिती करण्यात आलेली आहे व अशा नेमणूकीचे अधिकार तत्कालीन परिस्थितीत संबंधित राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमाच्या प्रमुखांना देण्यात होते. यामुळे अनेक नियुक्ती प्राधिकारी झाल्याने प्रशासकिय कामकाजात सुसूत्रता आणण्यास अडचणीचे होत होते.

गट क संवर्गाची समान कामकाज करणारी तांत्रिक पदे वेगवेगळ्या नियुक्ती प्राधिकाऱ्यांच्या अधिपत्याखाली असल्याने आपत्कालीन परिस्थिती किंवा तातडीच्या वेळेस अशी पदे रुग्णसेवेसाठी उपलब्ध करुन घेण्यास अडचणी येत होत्या. तसेच, गट ड च्या रुग्णालयीन विविध पदांच्या कामकाजाच्या स्वरुपात किरकोळ फरक आहे. परंतू, संवर्गांची नावे वेगवेगळी असल्याने रुग्णालयीन व्यवस्थापनाच्या कामकाजात कर्मचाऱ्याला एका संवर्गातून/पदावरुन दुसऱ्या संवर्गात/पदावर कामे देताना अडचणीचे ठरत होते.

कालानुरुप एखाद्या रोगाचे निर्मुलन किंवा प्रमाण कमी झाल्यास त्या कार्यक्रमांतर्गत उपलब्ध किंवा निर्माण केलेल्या पदांवरील कार्यरत कर्मचाऱ्यांना इतर आरोग्य संस्थामध्ये सेवा देणे भिन्न नियुक्ती प्राधिकारी असल्यामुळे शक्य होत नव्हते त्यामुळे उपलब्ध तांत्रिक मनुष्यबळाचा पुर्ण वापरही होत नव्हता.

विविध कामांचे एकत्रीकरण करुन मल्टीटास्कींग करुन संवर्ग संख्या कमी करण्याचे शासनाने धोरण निश्चित केलेले आहे. त्यानुसार रुग्णालयीन व्यवस्थापन करताना देखील गट ड विविध संवर्गाचे एकत्रीकरण करुन रुग्णालयाच्या निकडीनुसार मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्याची प्रकर्षाने आवश्यकता होती.

सामान्य प्रशासन विभागानेदेखील मल्टीटास्कींग करणे शक्य होईल यासाठी गट ड च्या विविध संवर्गासाठी समान शैक्षणिक अर्हता असे धोरण अवलंबिले आहे. त्यानुसार सार्वजनिक आरोग्य विभागाकडून गट ड संवर्गासाठी सामान्य प्रशासन विभागाने अधिसूचित केलेले गट ड संवर्गाचे सेवाप्रवेश नियम लागू करण्याचा शासननिर्णय दि.२४.०२.२०२१ रोजी निर्गमित केला आहे.

आरोग्य सेवेची व्याप्ती संपूर्ण राज्यभर असल्याने मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळाची आवश्यकता लागते अशा वेळेस आरोग्य विषयक विविध कामकाजासाठी एकछत्री नियुक्ती प्राधिकारी असण्याची बाब प्रकर्षाने निदर्शनास आली. यापार्श्वभूमीवर विभागाने वेळोवेळी सुधारणा करण्यात आलेल्या सेवाप्रवशे नियमांमध्ये अनुरुप बदल करण्याची सुरुवात केलेली आहे.

सामान्य प्रशासन विभागाने संदर्भ क्र. १ नुसार सरळसेवा, पदोन्नती व प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यासंदर्भात नियुक्ती प्राधिकारी घोषित करण्याबाबत दि. १९.११.२०१६ रोजी शासन निर्णय निर्गमित केला. या शासन निर्णयामध्ये गट ब अराजपत्रित, गट क आणि गट ड मधील पदांसाठी संबंधित विभागाचे सचिव/विभाग प्रमुख यांनी नियुक्ती प्राधिकारी घोषित करण्याबाबत स्वतंत्र आदेश निर्गमित करण्याबाबत प्रशासकिय विभागाने कार्यवाही करणेबाबत निर्देशित केलेल आहे त्यानुसार खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

## शासन निर्णय :

१. आयुक्त आरोग्य सेवा आयुक्तालय तथा अभियान संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई हे आरोग्य सेवा आयुक्तालयाच्या अधिनस्त गट क व ड संवर्गासाठी विभागप्रमुख म्हणून घोषित आहेत.

२. त्यांच्या अधिपत्याखालील विविध गट क व ड तांत्रिक व अतांत्रिक पदांसाठीचे नियुक्ती प्राधिकारी खालीलप्रमाणे घोषित करण्यात येत आहेत :

तक्ता १ :

| अ.क्र. | नियुक्ती प्राधिकारी | संवर्ग (गट क) |
|---|---|---|
| १. | संचालक आरोग्य सेवा (१) मुंबई व संचालक आरोग्य सेवा (२) पुणे. | संबंधित कार्यालयातील तांत्रिक व अतांत्रिक पदे |
| २. | उपसंचालक आरोग्य सेवा (सर्व परिमंडळे) | संबंधित परिमंडळातील गट क संवर्गातील सर्व पदे. (विविध राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम अंतर्गत अंधत्व निवारण, निक्षय भारत, कुष्ठरोग निर्मुलन, राष्ट्रीय हिवताप निर्मुलन, विविध साथरोग निर्मुलन कार्यक्रम, आ.मा.जि.,आ, मानसिक आरोग्य सहित सर्व राष्ट्रीय कार्यक्रमांसहित) |
| ३. | उपसंचालक आरोग्य सेवा परिवहन पुणे. | राज्यस्तरीय तांत्रिक पदे |
| ४. | उपसंचालक आरोग्य सेवा प्रयोगशाळा, पुणे | राज्यस्तरीय प्रयोगशाळा तांत्रिक पदे |
| ५. | उपसंचालक आरोग्य सेवा शुश्रूषा, मुंबई | अधिपरिचारीका व परिसेविका हे संवर्ग वगळून सर्व राज्यस्तरीय शुश्रूषा संवर्ग. |

तक्ता क्र. २ :

| अ.क्र. | नियुक्ती प्राधिकारी | संवर्ग (गट ड) |
|---|---|---|
| १. | संचालक आरोग्य सेवा (१) मुंबई व संचालक आरोग्य सेवा (२) पुणे. | संबंधित कार्यालयातील तांत्रिक व अतांत्रिक पदे |
| २. | संबंधित उपसंचालक आरोग्य सेवा | प्रादेशिक मनोरुग्णालयातील पदे |

| अ.क्र. | नियुक्ती प्राधिकारी | संवर्ग (गट ड) |
|---|---|---|
| ३. | जिल्हा शल्य चिकित्सक (सर्व) | रुग्णालयीन सेवा संबंधित सर्व पदे |
| ४. | सहाययक संचालक आरोग्य सेवा संबंधित आरोग्य कार्यक्रम | संबंधित कार्यक्रमांशी निगडीत पदे |

३. गट ड संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या रुग्णालयीन सेवा (सफाईगार व तत्सम वगळून) आंतरपरिवर्तनीय राहतील.

४. गट ड संवर्गातील कर्मचारी संबंधित जिल्ह्यांमध्ये आरोग्य सेवा रुग्णालयीन/ आरोग्य संस्था कार्यालयांमध्ये बदलीपात्र राहतील.

५. अनुकंपा तत्वावरील नियुक्त्या व लाड पागे वारसाहक्काने नियुक्त्यांसाठीही उपरोक्तनुसार नियुक्ती प्राधिकारी राहतील.

६. उपरोक्त नुसार आहरण व संवितरण अधिकारी नियुक्तीबाबत अनुषंगिक कार्यवाही करण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४०२१६१५२२३९५०१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

ARCHANA VILAS WALZADE

Digitally signed by ARCHANA VILAS WALZADE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PUBLIC HEALTH DEPARTMENT, 2.5.4.20=b17094004b015083dae757656e5d24847898197ddd6b0366a9177f097ed0887a, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=B4E19876AB3EEC36E3A3B988441648AB87470CDFE66B14CFBE7AC9BD770485C1, cn=ARCHANA VILAS WALZADE
Date: 2024.02.16 16:40:21 +05'30'

**अर्चना वालझाडे**

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य (यांचे प्रधान सचिव), मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री , महाराष्ट्र राज्य (यांचे प्रधान सचिवत्र,मंत्रालय,मुंबई.
३. सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव.
४. मा. विरोधीपक्ष नेता /विधानपरिषद /विधानसभा ,विधानभवन, मुंबई.
५. मा. संसद सदस्य/विधानमंडळ, महाराष्ट्र राज्य.
६. मा. मुख्य सचिव.
७. सर्व मंत्रालयीन विभागाचे अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय
८. मा. प्रबंधक, मुळ शाखा/अपील शाखा मा. उच्च न्यायालय खंडपीठ मुंबई/औरंगाबाद/नागपूर.
९. मा. प्रबंधक मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण खंडपीठ मुंबई/औरंगाबाद/नागपूर.
१०. मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
११. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
१२. सर्व सहसचिव/उपसचिव/अवर सचिव/कार्यासन अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय,मुंबई.

१३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता /लेखापरिक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
१४. अधिदान व लेखाअधिकारी मुंबई/नागपूर.
१५. सर्व विभागीय आयुक्त.
१६. सर्व जिल्हाधिकारी.
१७. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
१८. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१९. संचालक, आरोग्य सेवा-१, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई.
२०. संचालक, आरोग्य सेवा-२, आरोग्य सेवा संचालनालय, पुणे.
२१. सहसंचालक, आरोग्य सेवा (सर्व).
२२. उपसंचालक, आरोग्य सेवा (सर्व).
२३. सहायक संचालक आरोग्यसेवा (सर्व).
२४. जिल्हा शल्य चिकित्सक (सर्व).
२५. जिल्हा आरोग्य अधिकारी (सर्व).
२६. जिल्हा हिवताप अधिकारी (सर्व).
२७. प्रत : माहितीस्तव : मा. मंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव.
२८. अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक.
२९. सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक.
३०. सह सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक.
३१. निवड नस्ती (सेवा-५).